# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ३३ / २०२६

**नावात बदल करण्याबाबत.**

दत्तात्रय हिंदूराव यादव (ग्राहक)
अनंत दत्तात्रय यादव (वापरकता) ........................................................................................... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, कोल्हापूर शहर विभाग .......... ..... ..... ..... ..... .... प्रतिवादी १
(महावितरण)

दिपाली दत्तात्रय यादव (दिपाली योगेश माने) .......... ..... ..... ..... ..... .... .......... ..... ..... ..... ..... . प्रतिवादी २

उपस्थिती :-

| | | |
|---|---|---|
| अपिलार्थीतर्फे | :- | १) अनंत दत्तात्रय यादव<br>२) प्रभाकर भगवान पोलकर, प्रतिनिधी |
| प्रतिवादी १ | :- | १) अभिजीत सिखनीस, कार्यकारी अभियंता, कोल्हापूर शहर विभाग<br>२) हेमंत कासार, अतिरीक्त कार्यकारी अभियंता |
| प्रतिवादी २ | :- | अनुपस्थित |


कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ३ जून २०२६

आदेश पारित दिनांक :- १७ जून २०२६

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडल, (मंच) यांच्या केस क्रं.७०-२०२५ च्या दिनांक २९ जानेवारी २०२६



च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ३० मार्च २०२६ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक २९ जानेवारी २०२६ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*१) वापरकर्ते तक्रारदार ग्राहक अनंत दत्तात्रय यादव यांच्या मागणीनुसार मुळ ग्राहक दत्तात्रय हिंदूराव यादव यांचे नाव ग्राहक क्रमांक २६६५१०४००८७९ च्या वीज देयकावर आदेशाच्या तारखेपासून येणाऱ्या वीज देयकामध्ये नावात बदल करण्यात यावा. तसेच सदर वीज देयकावर वापरकर्ते अनंत दत्तात्रय यादव यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्ता नोंद करण्यात यावा.*

*२) बक्षीसपत्रानुसार दिपाली दत्तात्रय यादव यांच्या ४३.५० चौ.मी जागेमध्ये त्यांच्या **नवीन** वीज जोडणी अर्जानुसार **नवीन** घरगुती वीज पुरवठा **इतर कोणत्याही संमतीशिवाय** करण्यात यावा.*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ३ जून २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी वापरकर्ते अनंत दत्तात्रय यादव यांनी नमुद केले की, त्यांचे वडील कै. दत्तात्रय हिंदूराव यादव यांच्या नावे २३७७ सी वॉर्ड, शनिवार पेठ, कोल्हापूर येथील त्यांच्या मिळकतीत (८६ चौ.मीटर) घरात (३२० स्वेअर फुट) दिनांक ५ जानेवारी १९८५ पासून घरगुती वीज जोडणी (क्र.२६६५१०४००८७९) घेतलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| Name of Consumer (Original) | Consumer No. | Address on bill | Change of Name Application date. | Change of name Approved | Change of name (origanal name) was done as per Forums order |
|---|---|---|---|---|---|
| Dattaray Hindurao Yadav | 266510400879 | 2377 C Ward, Shaniwarpeth, Kolhapur - 416002 | On 30.09.2020, from Dipali Dattatray Yadav (Sister) (Online Application No. 27842618) | on 13.10.2020 in the name of Dipali Dattatray Yadav | Dattatray Hindurao Yadav on 15.02.2026 |

- अपिलार्थी यांचे वडीलांचे दिनांक १० जून २०२० रोजी निधन झाले. सदर घरात अपिलार्थी पुर्वीपासून व आताही राहत आहेत. अपिलार्थींची बहीण प्रतिवादी क्रं. २ श्रीमती दिपाली दत्तात्रय यादव (लग्नानंतर श्रीमती दिपाली योगेश माने) हिने सदर वीज जोडणीच्या नावात बदल करण्याचा ऑनलाईन अर्ज (क्र.२७८४२६१८) दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजी प्रतिवादी महावितरणकडे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

अपिलार्थींना न कळविता वादग्रस्त वडीलोपार्जीत तयार केलेल्या बक्षीसपत्राच्या आधारे इतर कागदपत्रे सादर केली. अपिलार्थींना सदर बाब लक्षात आल्यावर नावात बदल करू नये यासाठी महावितरणकडे ताबडतोब लेखी तक्रार दाखल केली. तथापि, प्रतिवादी १ महावितरणने प्रतिवादी २ श्रीमती दिपाली दत्तात्रय यादव हिच्या नावे १३ ऑक्टोबर २०२० रोजी वीज देयकातील नावात बदल करून दिला.

- अपिलार्थींने दिनांक २१ सप्टेंबर २०२० च्या प्रतिज्ञापत्रान्वये प्रतिवादी महावितरणला कळविले की, सदर वीज जोडणी असलेले घर हे अपिलार्थींच्या ताब्यात होत व आह. सदर वीज जोडणीची देयकांचा अपिलार्थी स्वतः भरणा करत आहेत व त्याच ठिकाणी अपिलार्थी राहत सुध्दा आहेत. वडिलांच्या मुत्यूनंतर सदर मिळकतीची सरस व निरस वाटण्या झालेल्या नाहीत. तरीही अपिलार्थींना समजले की, सदर घर मिळकतीत कोणत्याही नवीन वीज जोडणीची गरज नसताना प्रतिवादी २ श्रीमती दिपाली दत्तात्रय यादव हिने नवीन वीज जोडणीची मागणी अर्जान्वये केली आहे. परंतू तेथे नवीन वीज जोडणीची गरज नाही व सदर अर्ज रद्द करण्यात यावा हि विनंती तसेच सदर वीज जोडणी अपिलार्थी यांच्या परवानगी शिवाय देऊ नये. *(नोंदः- प्रतिवादी २ श्रीमती दिपाली दत्तात्रय यादव यांनी नवीन वीज जोडणीचा अर्ज अजूनपर्यंत दिला नाही असे प्रतिवादीने नमुद केले आहे)*

- सदर घराचे वीज देयक सप्टेंबर २०२० पर्यंत अपिलार्थींचे वडील कै. दत्तात्रय हिंदूराव यादव यांच्या नावे येत होते व अपिलार्थी सदर वीज जोडणीच्या देयकांचा सप्टेंबर २०२० पर्यंत नियमीतपणे भरणा कला आहे. **परंतू ऑक्टोबर २०२० चे वीज देयक प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव हिच्या नावे आले.** प्रतिवादी २ श्रीमती दिपाली दत्तात्रय यादव ने नावात बदल करण्याचा केलेल्या अर्जाचा प्रतिवादी महावितरणने सखोल तपासणी करणे गरजचे होते, जर त्यामध्ये काही गैरप्रकार असल्यास त्यावर कारवाई करणे ही प्रतिवादीची जबाबदारी आहे. सदर जागी वीजेचा उपयोग कोण करत आहे याचीही चौकशी महावितरणने केली नाही. अपिलार्थींने नमुद केले की प्रतिवादी २ **श्रीमती दिपाली दत्तात्रय यादव हिने वीज जोडणीच्या नावातील बदलाच्या ऑनलाईन अर्जासोबत दत्तात्रय हिंदूराव यादव यांचे मुत्यृपत्र, बक्षीसपत्र व मिळकतपत्र दाखल केले म्हणून नावात बदल केलेला आहे असे प्रतिवादी महावितरणचे म्हणणे चूकीचे आहे.**

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- प्रतिवादी १ महावितरणनने दिनांक १ डिसेंबर २०२० च्या पत्रान्वये अपिलार्थी यांच्याकडे मालकी हक्काच्या कागदपत्रांची मागणी केली आहे. सदर मिळकतीचे अदयाप अपिलार्थी व त्यांचे इतर नातेवाईक यांच्यात कोणत्याही प्रकारचे वाटप झाले नाही आहे. सदर मिळकतीचे कै. दत्तात्रय हिंदूराव यादव यांनी कोणासही न विचारता त्यांची मुलगी दिपाली दत्तात्रय यादव यांच्या **विवाहानंतर यांच्या नावे करून दिलेले दिनांक १४ जानेवारी २०२० चे बक्षीसपत्र बेकायदेशीर आहे. सदर मिळकतीचे वाटप होणेबाबत अपिलार्थीने दिनांक १९ जानेवारी २०२१ रोजी दिवाणी न्यायालय कोल्हापूर (स्पे.के.नं.१३०/२०२१) येथे दाखल केलेला आहे व तो न्यायप्रवीष्ट आहे.**

- अपिलार्थीने दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी वीज जोडणीच्या नावातील झालेला बदल पुर्ववत व्हावा यासाठी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक १० फेब्रुवारी २०२६ च्या आदेशान्वये वापरकर्ते तक्रारदार ग्राहक अनंत दत्तात्रय यादव यांच्या मागणीनुसार मुळ ग्राहक दत्तात्रय हिंदूराव यादव यांचे नाव ग्राहक क्रमांक २६६५१०४००८७९ च्या वीज देयकावर आदेशाच्या तारखेपासून येणाऱ्या वीज देयकामध्ये नावात बदल करण्यात यावा, सदर वीज देयकावर वापरकर्ते अनंत दत्तात्रय यादव यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्ता नोंद करण्यात यावा व बक्षीसपत्रानुसार दिपाली दत्तात्रय यादव यांच्या कथीत ४३.५० चौ.मी जागेमध्ये त्यांच्या नवीन वीज जोडणी अर्जानुसार नवीन घरगुती वीज पुरवठा **इतर कोणत्याही संमतीशिवाय** करण्यात यावा असे निर्देश दिले.

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक ३० मार्च २०२६ रोजी मा. विघुत लोकपाल (मुंबई) यांचे कडे अभिवेदन दाखल केले व मंचाच्या आदेशातील मुद्दा क्रं.२ बक्षीस पत्रानुसार दिपाली दत्तात्रय यादव यांच्या ४३.५० चौ मि. जागेमध्ये त्यांच्या नवीन वीज जोडणी अर्जानुसार नवीन घरगुती वीज पुरवठा **इतर कोणत्याही संमतीशिवाय** करण्यात यावा हे मान्य नाही, कारण सदर मिळकतीबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल असून तो न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे तो रद्द करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

३. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ३ जून २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- कै.दत्तात्रय हिंदूराव यादव, २३७७ सी वॉर्ड, शनिवार पेठ, कोल्हापूर, ग्राहक क्र.२६६५१०४००८७९ यांच्या नावे असलेल्या वीज देयकातील नावात बदल दिपाली दत्तात्रय यादव असा करणेत आलेला होता. **सदरचा नावात बदल हा दिनांक २९ सप्टेंबर २०२० चे प्रतिज्ञापत्र, दिनांक १४ जानेवारी २०२० चे बक्षीसपत्र, नगर भुमापन कार्यालय कोल्हापूर यांचेद्वारे देणेत आलेले मालमत्ता पत्रक,** दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजी केलेल्या ऑनलाईन अर्ज (क्र.२७८४२६१८) नुसार दिनांक १३ डिसेंबर २०२० रोजी करणेत आला आहे. सदर जागेत सध्या अपिलार्थी राहत आहेत.

- मंचाच्या दिनांक १० फेब्रुवारी २०२६ आदेशान्वये नावात झालेला बदल पुर्ववत नाव दत्तात्रय हिंदूराव यादव असे दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ असे करणेत आलेला आहे. आदेशातील मुद्दा क्र.२ विषयी अपिलार्थींने हरकत घेतलेली आहे. सबब आदेशाच्या अनुषंगाने अद्यापही सदर मिळकतीमध्ये नवीन वीज जोडणीची मागणी न आल्याने वीज जोडणी देणेत आलेली नाही. भविष्यात नवीन वीज जोडणीची मागणी आलेस, मंचाच्या आदेशानुसार नवीन वीज जोडणी दयावी लागणार आहे.

४. प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव हया दिनांक ३ जून २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान अनुपस्थित राहील्या होत्या.

**विश्लेषण व निर्णय**

५. पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थी अनंत दत्तात्रय यादव यांनी नमुद केले की त्यांचे वडील दत्तात्रय हिदूंराव यादव यांच्या कोल्हापूर येथील मिळकतीतील घरगुती वीज जोडणी अपिलार्थीच्या वडींलाच्या निधनानंतर प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव हिच्या नावावर करण्यात आली. सदर वीज जोडणीच्या नावातील बदलाबाबत अपिलार्थीने प्रतिवादी महावितरणकडे वारंवार तक्रारी दाखल केल्या, व संबधीत घर हे अपिलार्थीच्या मिळकतीत असून सदर वीज जोडणीची वीज देयकांचा सप्टेंबर २०२० पर्यंत भरणा ते करत असल्याचे कळविले. अपिलार्थीने नमुद केले की, वडीलोपार्जीत मिळकतीचे कोणतीही वाटणी झालेली नसताना व अपिलार्थीच्या इतर नातेवाईकांच्या संमतीशिवाय प्रतिवादी महावितरणने सदर वीज जोडणीतील नावात बदल केलेला होता. महावितरणने नावात बदल करताना सादर केलेल्या कागदपत्रांची व प्रत्यक्ष वापराची

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

पुरेशी पडताळणी केली नाही. सदर मालमत्तेबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल असून तो प्रलंबित आहे. मंचाच्या आदेशानुसार मुळ ग्राहकाचे नाव वीज देयकावर पुन्हा नमुद करण्यात यावे व प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव यांनी स्वतंत्र अर्ज केल्यास नवीन वीज जोडणी देण्याचे निर्देश दिले. परतू सदर मिळकतीबाबत न्यायालयीन वाद सुरू असल्याने प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव यांनी अर्ज केल्यास **'इतर कोणत्याही संमतीशिवाय'** नवीन वीज देण्याच्या निर्देशाला अपिलार्थीचा विरोध आहे. म्हणून माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे तक्रार दाखल केली.

७. कै.दत्तात्रय हिंदूराव यादव यांच्या नावावरील वीज जोडणीचे नाव बदल करून दिपाली दत्तात्रय यादव यांच्या नावावर करताना त्यांनी सादर केलेले दिनांक २९ सप्टेंबर २०२० चे प्रतिज्ञापत्र, दिनांक १४ जानेवारी २०२० चे बक्षीसपत्र, नगर भुमापन इत्यादी कागदपत्रांच्या आधारे केल्याचे प्रतिवादीने स्पष्ट केले आहे. सध्या प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव कडून संबधित मिळकतीत **नवीन** वीज जोडणीचीसाठीचा अर्ज आलेला नाही, परंतू तसा अर्ज आल्यास भविष्यात मंचाच्या आदेशानुसार त्यावर कार्यवाही करावी लागेल.

८. अपिलार्थी व प्रतिवादी यांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच सुनावणी दरम्यान मांडलेली बाजू लक्षात घेऊन मंचाच्या आदेशातील मुद्दा क्रं.२ गैर लागू असून त्यामध्ये अंशतः बदल करून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

- बक्षीसपत्रानुसार प्रतिवादी २ दिपाली दत्तात्रय यादव यांच्या कथीत ४३.५० चौ.मि. जागेमध्ये नवीन वीज जोडणीचा अर्ज भविष्यकाळात त्यांच्याकडून आल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम, २०२१ (कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी विनियम, २०२१) मधील वीज पुरवठयासाठीची विनियम व मार्गदर्शक तत्वे यांच्या आधीन राहून नियमानुसार नवीन वीज जोडणी देण्याची कार्यवाही करावी.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.